**Lecture on National Education Policy 2020 – Themes and Prospects**

# 'नूतन मराठा' त शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा

**प्रतिनिधी** | जळगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ .व नूतन मराठा महाविद्यालयातर्फे 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० आशय आणि उद्देश' या विषयावर विद्यापीठाचे प्रा.डॉ. दीपक दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली तर डॉ. अविनाश बडगुजर यांच्या अध्यक्षतेखाली एक दिवसीय कार्यशाळा झाली.

डॉ. दलाल यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचा आशय सहज सोप्या भाषेत सांगितला. बहुभाषिकता, विषय निवडीचे स्वातंत्र्य, मातृभाषेतून शिक्षण, कला गुणांना वाव आणि कौशल्ये विकसित करून त्यांना व्यवसायाभिमुख शिक्षण देण्याची व्यवस्था नवीन धोरणात आहे असे सांगितले.